## उल्हासनगर महानगरपालिका,उल्हासनगर

जा.क्र. उमपा/आ.का./२३०/२०२१

दिनांक : २० एप्रिल, २०२१

# : परिपत्रक :

**विषय :- श्रीरामनवमी २०२१ मार्गदर्शक सूचना**

**वाचा :- १) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७**
**२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५**
**३) आदेश क्र.उमपा/आ.का./२२८/२०२१ दिनांक १४ एप्रिल, २०२१**
**४) गृह विभाग,महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.आरएलपी-०४२१/प्र.क्र.११४/ विशा-१ब दिनांक २० एप्रिल, २०२१**

श्रीरामनवमी उत्सव संपूर्ण राज्यात मोठया प्रमाणात व उत्साहाने साजरा केला जातो. चालू वर्षी दि. २१ एप्रिल, २०२१ रोजी श्रीरामनवमी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. कोव्हीड-१९ च्या अनुषंगाने यावर्षी सर्व धर्मीय सण/उत्सव तसेच सर्व कार्यक्रम अतिशय साधेपणाने साजरे करण्यात येत आहेत. सध्या कोव्हीड-१९ च्या दुस-या लाटेमुळे उद्भवलेल्या अतिसंसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता व वाढत्या कोरोना रुग्णांच्या संख्येचा विचार करता संदर्भिय आदेश क्र. ३ दिनांक १४ एप्रिल, २०२१ मधील आदेशानुसार व त्यातील मुद्दा क्र. १,२,७ व १० मध्ये नमुद तरतुदींच्या अनुषंगाने अधिन राहून यावर्षी श्रीरामनवमी उत्सव साजरा करणे आवश्यक आहे, त्यादृष्टीने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

१. श्रीरामनवमी लोक मोठया प्रमाणात एकत्रित येऊन साजरी करतात, परंतू यावर्षी कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव टाळण्यासाठी लोकांनी एकत्र न येता साधेपणाने आपआपल्या घरी श्रीरामनवमी उत्सव साजरा करणे अपेक्षित आहे.

२. दरवर्षी श्रीरामनवमी साजरी करताना संपूर्ण विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. परंतू कोव्हीड-१९ चा वाढता प्रादुर्भाव पाहता सर्व धार्मिक स्थळे बंद ठेवण्यात आली असल्याने मंदिरात पूजा अर्चा व व दर्शनासाठी जाता येणार नाही. तसेच यावर्षी मंदिरात भजन, किर्तन, पठण इत्यादींचे किंवा कोणत्याही प्रकारे धार्मिक, सांस्कृतिक अथवा सामाजिक कार्यक्रमांचे सार्वजनिक आयोजन करण्यात येऊ नये.

३. मंदिरामधील व्यवस्थापक/विश्वस्त यांनी शक्य असल्यास दर्शनाची ऑनलाईन सुविधा, केबल नेटवर्क, वेब साईट व फेसबुक इत्यादीव्दारे उपलब्ध करुन द्यावी.

४. श्रीरामनवमीच्या उत्सवानिमित्त कोणत्याही प्रकारे प्रभात फेरी, मिरवणूका काढण्यात येवू नयेत.

५. कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिका प्रशासन व पोलीस प्रशासन यांनी विहीत केलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच या परिपत्रकानंतर व प्रत्यक्ष सण सुरु होण्याच्या मधल्या कालावधीत अजून काही सूचना प्रसिध्द् झाल्यास त्याचे देखील अनुपालन करावे.

६. सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, कोरोना बाबत काळजी घ्यावी. त्रिसुत्र जसे नियमित भौतिक अंतर ठेवणे, मास्कचा वापर करणे, हात धुणे व सॅनिटायझरचा वापर करणे तसेच अन्य प्रतिबंधात्मक उपाययोजनेचे पालन करावे.

तरी सर्व नागरिकांनी वरील सूचनांचे पालन करुन कोरोना आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिकेस सहकार्य करावे. उक्त परिपत्रकाची अंमलबजावणी करण्यास कोणत्याही व्यक्तीने टाळाटाळ केल्यास विरोध दर्शविल्यास संबंधितांचे विरुध्द् यथास्थिती आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील कलम ५१ ते ६०, साथरोग नियंत्रण अधिनियम, १८९७ व भारतीय दंड संहिता, १८६० कलम, १८८ मधील तरतुदीनुसार दंडनीय व कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**(डॉ.पंकज आशिया,** भा.प्र.से.)
**आयुक्त**
**उल्हासनगर महानगरपालिका**

**प्रत-**

१. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.
२. मा. पालकमंत्री तथा मंत्री नगरविकास विभाग महोदयांचे खाजगी सचिव.
३. मा. मुख्य सचिव महोदयांचे विशेष कार्य अधिकारी.
४. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग.
५. मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
६. मा. पोलीस आयुक्त, ठाणे.
७. मा.महापौर, मा.उप महापौर, मा.सभापती स्थायी समिती, मा.सभागृह नेता, मा.विरोधी पक्षनेता, मा.सभापती प्रभाग समिती, सर्व गटनेता, सर्व सन्माननीय महापालिका सदस्य यांचेकडे माहितीसाठी.
८. मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती/आरोग्य परिक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती/महसूल समिती/पाणी पुरवठा व मलनिस्सारण समिती/सार्वजनिक बांधकाम समिती/नियोजन व विकास समिती/पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती/गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती/क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती.
९. पोलिस उप आयुक्त, परिमंडळ - ४, उल्हासनगर.
१०. सहाय्यक पोलिस आयुक्त, उल्हासनगर/अंबरनाथ.
११. वरिष्ठ पोलिस निरिक्षक, उल्हासनगर/मध्यवर्ती/विठ्ठलवाडी/हिललाईन पोलिस स्टेशन.
१२. जनसंपर्क अधिकारी, उ.म.पा. यांनी सदर परिपत्रकाची उचित माध्यमांव्दारे जास्तीत जास्त प्रसिध्दी करावी.
१३. अतिरिक्त आयुक्त, सर्व उप आयुक्त.
१४. सर्व विभागप्रमुख. सर्व सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती कार्यालये.
१५. सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग यांजकडे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग,

मंत्रालय (मुख्य इमारत), दुसरा मजला,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई- ४०० ०३२.

---

क्रमांक- आरएलपी- ०४२१/प्र.क्र.११४/विशा- १ ब  दिनांक- २० एप्रिल, २०२१.

<u>परिपत्रक</u>

**श्रीरामनवमी, २०२१ मार्गदर्शक सूचना.**

श्रीरामनवमी उत्सव संपूर्ण महाराष्ट्र राज्यात मोठ्या प्रमाणात व उत्साहाने साजरा केला जातो. चालू वर्षी दि. २१ एप्रिल, २०२१ रोजी श्रीरामनवमी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. कोविड- १९ च्या अनुषंगाने यावर्षी सर्व धर्मीय सण/उत्सव तसेच सर्व कार्यक्रम अतिशय साधेपणाने साजरे करण्यात येत आहेत. सध्या कोविड- १९ च्या दुसऱ्या लाटेमुळे उद्भवलेल्या अतिसंसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता व वाढत्या कोरोना रुग्णांच्या संख्येचा विचार करता महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई यांच्या दिनांक १३ एप्रिल, २०२१ च्या आदेशामधील मुद्दा क्र. १, २, ७ व १० मध्ये नमूद तरतुदींच्या अधिन राहून या वर्षी श्रीरामनवमी उत्सव साजरा करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत:-

१. श्रीरामनवमी लोक मोठ्या प्रमाणात एकत्रित येऊन साजरी करतात. परंतु यावर्षी कोविड- १९ चा प्रादुर्भाव टाळण्यासाठी लोकांनी एकत्र न येता साधेपणाने आपआपल्या घरी श्रीरामनवमी उत्सव साजरा करणे अपेक्षित आहे.

२. दरवर्षी श्रीरामनवमी साजरी करताना संपूर्ण महाराष्ट्रात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. परंतु कोविड- १९ चा वाढता प्रादुर्भाव पाहता सर्व धार्मिक स्थळे बंद ठेवण्यात आली असल्याने मंदिरात पूजा अर्चा व दर्शनासाठी जाता येणार नाही. तसेच यावर्षी मंदिरात भजन, किर्तन, पठण इत्यादींचे किंवा कोणत्याही प्रकारे धार्मिक, सांस्कृतिक अथवा सामाजिक कार्यक्रमांचे सार्वजनिक आयोजन करण्यात येऊ नये.

३. मंदिरामधील व्यवस्थापक/विश्वस्त यांनी शक्य असल्यास दर्शनाची ऑनलाईन सुविधा, केबल नेटवर्क, वेब साइट व फेसबुक इत्यादी द्वारे उपलब्ध करुन द्यावी.

४. श्रीरामनवमीच्या उत्सवानिमित्त कोणत्याही प्रकारे प्रभात फेरी, मिरवणुका काढण्यात येऊ नयेत.

५. कोविड- १९ च्या विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या मदत व पुनर्वसन, आरोग्य, पर्यावरण, वैद्यकीय शिक्षण विभाग तसेच संबंधित महानगरपालिका, पोलीस प्रशासन, स्थानिक प्रशासन यांनी विहित केलेल्या नियमांचे काटेकोर पालन करावे. तसेच या परिपत्रकानंतर व प्रत्यक्ष सण सुरु होण्याच्या मधल्या कालावधीत अजून काही सूचना प्रसिध्द झाल्यास त्यांचे देखील अनुपालन करावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२१०४२०११३९०६४७२९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Sanjay Dagadu Khedekar

Digitally signed by Sanjay Dagadu Khedekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a53701d2758331055dd3c46d615f8367912b1c64cd218e709c1b4de20bdf4f85, cn=Sanjay Dagadu Khedekar
Date: 2021.04.20 11:47:17 +05'30'

**(संजय खेडेकर)**
उप सचिव, गृह विभाग.

प्रत माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मा. विरोधीपक्ष नेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य.
८. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
११. सर्व मा. महापौर, महानगर पालिका.
१२. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१३. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
१४. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
१६. सचिव व महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१७. सर्व आयुक्त, महानगर पालिका.
१८. सर्व पोलीस आयुक्त.
१९. सर्व जिल्हाधिकारी.
२०. सर्व पोलीस अधीक्षक.
२१. सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका.
२२. निवडनस्ती.